नियमित दिवाणी दावा क्रमांक २६/२०२५
मारुती आटपाडकर/ दादासो खोत

**<u>निशाणी क्रमांक १९ वरील आदेश</u>**

**मारुती आटपाडकर वि. दादासो खोत**

प्रस्तुतचा अर्ज वादीने जैसे थे परिस्थीती ठेवण्याबाबत प्रतिवादींना आदेशित करण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ने सरकारी मोजणीसाठी अर्ज दिला असून दि. २८.०३.२०२५ रोजी मोजणी करण्याबाबत उपअधीक्षक भूमी अभीलेख कवठेमहांकाळ यांनी नोटीस बजावलेली आहे. सदर मोजणीच्या आधारे प्र.क्र. १ हा दावा मिळकतीचा कब्जा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रतिवादींनी अदयाप त्यांचा लेखी जबाब सादर केलेला नाही. परंतु ते वादमिळकतीचा ताबा घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. करीता नि.क्र. ५ वरील आदेशापर्यंत जैसे थे परिस्थीती ठेवण्याबाबत प्रतिवादींना आदेशित करण्याची विनंती वादीने केली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांचे उत्तर सादर करुन प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविला. त्यांनी कथन केले की, दावा मिळकत गटाशी वादींचा कोणताही संबंध नाही. प्रतिवादींची सदरची मिळकत वडिलार्जित असून गट एकत्रीकरणाच्या नोंदी देखील अदयाप कायम आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये पेट्रोल पंप टाकण्याबाबत नियोजित केले आहे. त्याकरीता मोजणीची आवश्यकता आहे.

०२. वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादीं दावा मिळकतीत ताबा घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु मुळात दावा मिळकतीवर ताबा वादीचा की प्रतिवादीचा ही बाब विवादीत आहे. उलटपक्षी प्रथमदर्शनी असे दिसून येते की, महसूल अभीलेखात सन १९७२ पासून दावा मिळक्तीवर प्रतिवादींच्या नावांच्या नोंदी आहेत. सदरच्या गट एकत्रीकरणाच्या नोंदी तपासण्याचा अधिकार या न्यायालयास नाही. वादींचे थोडक्यात कथन असे आहे की, त्यांच्या मिळक्तीला चुकीचा गटक्रमांक लागलेला आहे. परंतु सदरच्या कथनास प्रथमदर्शनी पुरावा नाही. गट एकत्रीकरणाच्या नोंदी अदयाप कायम आहेत. दावा मिळकतीचा ताबा ही बाब विवादीत आहे. वादींकडे दावा मिळकतीचा ताबा असल्याबाबत प्रथमदर्शनी पुरावा नाही.

०३. वादींच्या कथनाप्रमाणे सातबारा उतारा व गट एकत्रीकरणाच्या नोंदी चुकीच्या

झाल्याबाबत त्यांना आता लक्षात आले व त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. परंतु गट क्र.३३० च्या सातबारा उता-याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की वादीने त्याचे वडिलाच्या निधनानंतर त्याचे व इतर वारसांच्या नावांची नोंद सातबारा उताराा सदरी करुन घेतलेली आहे. त्यामुळे सदरचे कथन अविश्वासार्ह वाटते. वरील सर्व कारणांवरुन मी या निष्कर्षापर्यंत येतो की, जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबत अत्यावश्यक परिस्थीती अभीलेखावर नाही. प्रथमदर्शनी प्रतिवादींचा देखील वादमिळकतीमध्ये हितसंबंध असल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी अंतरिम मनाई आदेशाच्या अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही. परंतु केवळ त्या कारणांवरुन वादी जैसे थे परिस्थीतीचा आदेश मिळण्यास पात्र ठरत नाही. करीता वरील कारणांसाठी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2025.03.25 07:27:57 +0530

(अरुण र. व्यवहारे)

दिनांक २४.०३.२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर कवठेमहांकाळ

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Court | - CJJD and JMFC, Kavathe-Mahankal. |
| Date | - 24.3.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | -24.3.2025 |
| Order uploaded on | -25.03.2025 |